दैनिक
# कुलस्वामिनी संदेश
उस्मानाबाद,लातूर,नांदेड,बीड,हिंगोली,परभणी,यवतमाळ येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे दैनिक दि. 05/08/2020

# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे बाबासाहेबांच्या विचाराचे पतंग-राजेश इंगळे

**साहेबराव दावलेकर...**

बिलोली / प्रतिनिधी : साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे प्रेरीत झालेला पतंग असुन आपण त्यांच्या कार्याची दखल घेण्याची गरज आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ता राजेश ईंगळे यांनी दगडापुर ता.बिलोली येथे केले.

बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणेच्या वतीने बिलोली तालुका समतादुत श्रीमती शारदा माळे यांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षे जयंती ऑनलाईन जयंती करण्याचे नियोजन दगडापुर येथे केले होते त्या प्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून राजेश ईंगळे उपस्थितीत जनतेला मार्गदर्शन केले. प्रारंभ अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतीमेस पुष्पाहार मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून (समतादुत )जिल्हा प्रकल्प आधीकारी सुजाता पो-हरे यांच्या प्रास्ताविकेनंतर प्रमुख अतिथी यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन सरपंच सौ.अंजना राजेश डांगे होत्या तर सुत्रसंलन शिल्पाताई संतोष सुर्यवंशी केले तर आभार समतादुत श्रीमती शारदा माळे यांनी मानले. या कामी बार्टी चे महासंचालक श्री कैलास कणसे, निबंधक याद-वराव गायकवाड, समतादुत प्रकल्पाच्या मुख्य संचालीका प्रज्ञा वाघमारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

अधिकाऱ्यांनी कार्यालयात नियमित बसून प्रशासकीय कारभार हाकणे क्रमप्राप्त

असून, तेही बदलीच्या प्रयत्नात असल्याची चर्चा आहे.

संवर्गातील सुमारे ५० कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती दिली. विभागातील

जिल्हा धीं रुग्णालय अमरावती येथील औषध निर्माण अधिकारी राजेंद्र

# अकोला जिल्हात बार्टी समतादूत यांचे मार्फत अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी निमित्त ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रम !

प्रतिनिधी/३ ऑगस्ट

पातूर :- महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे अंतर्गत ना.धनंजय मुंडे, ना.विश्वजित कदम, भाप्रदेस पराग जैन, कैलास कणसे महासंचालक बार्टी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक समतादूत प्रकल्प यांच्या संकल्पनेतून समतादूत प्रकल्पाच्या संयोजनात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अनुसूचित जातीतील तळागाळातील वंचित घटकाच्या सामाजिक, आर्थिक व मानसिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती त्यामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या व बार्टीच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहचवणे व त्यांना त्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ कसा मिळेल यासाठी जनजागृती करणे.यासोबत या ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत प्रसिद्ध वक्ते, प्रबोधनकार, विचारवंत, कवी, साहित्यिक, अधिकारी वर्ग यांचा सहभाग करून त्यांच्या माध्यमातून शैक्षणिक, प्रबोधनात्मक जनजागृतीपर व्याख्याने, चर्चासत्रे आयोजित करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप असून हे कार्यक्रम समतादूत आपल्या तालुका कार्यक्षेत्रात आयोजित करत आहेत. समतादूत मनुष्यबळा मार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व राज्यघटनेतील नमूद समता न्याय बंधुता हे मूलभूत तत्व जन सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी समाजात सामाजिक सलोखा बंधुभाव निर्माण व्हावा यासाठी कार्य केले जाते. कोरोना प्रादुर्भाव लॉकडाऊन काळात समतादूत यांनी आपल्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू प्रादुर्भाव जनजागृती केली विविध ठिकाणी स्थानिक सामाजिक संघटना यांच्या सोबत स्वयंस्फूर्तीने मदतकार्य करत आपले योगदान दिले. त्यामध्ये सर्वांनी शासनाच्या निर्देशांचे पालन करावे याबाबत जनजागृती केली.

कोरोना प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असल्याने बार्टी मार्फत एम.पी.एस.सी.ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत ऑनलाइन कोचिंग सुरू केले आहेत.बार्टीच्या या अभिनव उपक्रमाचा जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा यासाठी समतादूतांमार्फत या उपक्रमाचा सोशल मीडिया च्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष प्रचार प्रसार करण्यात आला.यामध्ये विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. यासोबत समतादूत यांचे मार्फत जिल्हातील गावपातळीवर अनुसूचित जातीतील कुटुंब व सदस्य किती हे माहिती संकलन सुरु आहे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्मशताब्दी महोत्सव आपण यावर्षी साजरा करत आहो. त्यामध्ये समतादूत यांचेमार्फत जिल्हातील आपल्या तालुका कार्यक्षेत्रात ऑनलाइन प्रबोधन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.त्यामध्ये समतादूत हे आपल्या तालुक्यातील विद्यार्थी तसेच इतर लाभार्थ्यांना सहभाही करून विविध मार्गदर्शक प्रबोधन कार्यक्रम ऑनलाइन स्वरूपात आयोजित करत आहेत..हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकोला जिल्हातील समतादूत इतर समतादूत यांनी परिश्रम घेतले.

# अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**ब्रम्हपुरी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०० व्या जयंती प्रित्यर्थ संपूर्ण महाराष्ट्रातील समतादुत यांनी झूम अॅप द्वारा प्रबोधन तथा मार्गदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



बार्टी पुणे च्या ब्रम्हपुरी येथील समतादुत वर्षा कारेंगुलवार यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती प्रित्यर्थ झूम अँप द्वारा मार्गदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा समतादुत प्रकल्प अधिकारी मनिष गणवीर प्रमुख मार्गदर्शक प्रशांत डांगे पत्रकार ब्रम्हपुरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. पत्रकार प्रशांत डांगे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजबांधवांनी आत्मसात करावे. अंधश्रद्धा समाजातून नाहीशी करून शिक्षण घेऊन समाजाची प्रगती करावी असे विचार मार्गदर्शन करताना मांडले. झूम अँप द्वारा आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ऑनलाइन मध्ये दोनशे लोकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन व आभार प्रदर्शन समतादूत वर्षा कारेंगुलवार यांनी केले.

ाक्य
रता
ील
जन
ील
र्णय
ाळा
धा,
ा व
ावा
खी
ाहे.
या
ला
ारी

# अन्नाभाऊसाठे की जन्मशताब्दी महोत्सव ऑनलाइन



**प्रतिनिधि/ वि.३**

**अमरावती-** डॉ.बाबासाहब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे सामाजिक न्याय व विशेष सहायक विभाग की स्वायत्त संस्था व्दारा साहित्यरत्न लोकशाहीर अन्नाभाऊ साठे की जन्मशताब्दी महोत्सव के अवसर पर जन्मशताब्दी सप्ताह ऑनलाइन तरीके से आयोजित किया गया.

ऑनलाइन तरीके से विभिन्न मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित किये गए थे. जन्मदिन पर दो सत्र में व्याख्यान का कार्यक्रम आयोजित किया गया था.

पहले सत्र में सुधाकर खडसे व दूसरे सत्र में प्रा.बबन इंगोले ने मार्गदर्शन किया. इस कार्यक्रम में बतौर अध्यक्ष के रूप में मध्यवर्ती कारागृह अधिक्षक रमेश कांबले, प्रमुख महमान दिलीप येडतकर, अक्षय येडतकर, प्रा.जगदीश गोवर्धन उपस्थित थे.

## डॉ.बाबासाहब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था का उपक्रम

प्रास्ताविक विजय वानखडे, मंच संचालन अनिता गवई, आभार प्रदर्शन शुभांगी बोरनकर ने किया. इस समय संभव इंगोले ने कार्यक्रम को सफल बनाने के लिए अथक प्रयास किये.

...डक्यात...

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त 'बार्टी'च्यावतीने व्याख्यान

नेवासाफाटा (वार्ताहर)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था 'बार्टी' च्यावतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त प्रा. डी. के. मांडलिक यांचे ऑनलाईन व्याख्यान नुकतेच पार पडले. शिरूर तालुका समतादूत रेश्मा साळवे यांनी हा कार्यक्रम आयेजित केला होता. सी.टी. बोरा महाविद्यालयाचे प्रा. डी.के. मांडलीक यांनी व्याख्यानात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन व कार्य याविषयी माहिती दिली. कार्यक्रमास बार्टीचे अधिकारी दिलावर सवय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास प्रतिष्ठान जुन्नरचे अध्यक्ष काशीनाथ आल्हाट उपस्थित होते. बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, समतादूत प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे, पुणे जिल्हा प्रकल्प अधिकारी शीतल बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

संज

भारत

कोप
निगडीत
असलेल
इंडियन
नॅशनल
कॉम्पी
अंतर्गत
ग्रुप
क्षेत्रात
वापरा
ऑर्ग
देश
या
विशेष
कामा
तरी
उर्जा